ePaper

**खळबळजनक! 2 महिन्यातच विजय यांचं सरकार पाडण्याचं षडयंत्र?**

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 02 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!






स्वयंघोषित नेत्यांना भाजपाचा दणका!

## सहा जिल्ह्यांना रेड अलर्ट; तर मुंबईत ऑरेंज अलर्ट

# राज्यात मान्सूनचे दमदार पुनरागमन



**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यात मान्सूनने पुन्हा जोरदार हजेरी लावली असून, पुढील काही दिवस पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. कोकण किनारपट्टी, घाटमाथा आणि काही अंतर्गत भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, राज्यातील सहा जिल्ह्यांसाठी 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला आहे.**

कोकणातील बहुतांश भागात मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता असल्याने प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अतिवृष्टीचा इशारा लक्षात घेऊन पालघर जिल्ह्यात बुधवार, २ जुलै रोजी सर्व शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

मुंबईतही हंगामातील पहिल्या दमदार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले. अनेक सखल भागांमध्ये पाणी साचल्याने वाहतूक आणि दैनंदिन व्यवहारांवर परिणाम झाला. पुढील पाच दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता असल्याने मुंबईसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडणे टाळावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, रत्नागिरी जिल्ह्यासाठी आज, पालघरसाठी २ जुलै, रायगडसाठी ३ व ४ जुलै, तर ठाण्यासाठी ४ जुलै रोजी 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला आहे. याशिवाय, पुणे जिल्ह्यातील घाटमाथ्यासाठी २, ३ आणि ४ जुलै, तसेच सातारा जिल्ह्यातील घाटमाथ्यासाठी ५ जुलै रोजी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

सततच्या पावसामुळे नदी-नाले, धबधबे आणि घाट परिसरात पाण्याची पातळी वाढण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा, तसेच पर्यटनस्थळी जाण्यापूर्वी हवामानाचा अंदाज आणि स्थानिक प्रशासनाच्या सूचनांची माहिती घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### मुंबईला 'ऑरेंज अलर्ट'

हवामान विभागाने राज्यातील रत्नागिरी, पालघर, रायगड, ठाणे तसेच पुणे व सातारा जिल्ह्यांतील घाटमाथा परिसरासाठी 'रेड अलर्ट' जारी केला आहे. मुंबईसाठी पुढील पाच दिवस 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला असून, मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहून प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पालघरमध्ये शाळांना सुट्टी

अतिवृष्टीच्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर पालघर जिल्ह्यात २ जुलै रोजी सर्व शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मुसळधार पावसामुळे पूरस्थिती, वाहतूक विस्कळीत होणे आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला. नागरिकांनीही अनावश्यक प्रवास टाळून हवामान विभाग आणि स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महिलांना मिळकत करात ५०% दिलासा!

## ५०० चौ. फुटांपर्यंतच्या घरांना सवलत; पुणे महापालिकेचा महत्त्वाचा निर्णय

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे महापालिका हद्दीतील महिलांच्या नावावर असलेल्या ५०० चौरस फुटांपर्यंतच्या निवासी मिळकतींना मिळकत करात ५० टक्के सवलत देण्याच्या महत्त्वपूर्ण प्रस्तावाला महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली आहे. आता हा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार असून, शासनाची मान्यता मिळाल्यानंतर त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.**




महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४०-अ आणि १४०-ब अंतर्गत करसवलतीच्या तरतुदींनुसार हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या योजनेचा लाभ ३१ मार्च २०२५ रोजी महिलांच्या नावावर नोंद असलेल्या निवासी मिळकतींनाच मिळणार आहे. तसेच ही सवलत आर्थिक वर्ष २०२६-२७ मधील चालू मिळकत करापुरतीच मर्यादित राहणार आहे.

महापालिकेने स्पष्ट केले आहे की, १ एप्रिल २०२६ पूर्वीची थकबाकी, व्याज, दंड आणि शास्तीवर कोणतीही सवलत लागू होणार नाही. अनधिकृत मिळकतींवरील शास्तीही पूर्ववत कायम राहणार असून, संबंधित कायद्यातील तरतुदी लागू राहतील.

याशिवाय, ज्या मिळकतींना सध्या ४० टक्के करसवलत मिळत आहे, त्यांना नव्या योजनेत ५० टक्क्यांऐवजी २५ टक्के सवलत देण्याचा प्रस्ताव आहे. महिलांच्या नावावर मालमत्ता नोंदणीला प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणे, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

महापालिकेच्या आकडेवारीनुसार, शहरात महिलांच्या नावावर सुमारे ७० हजार ७७३ निवासी मिळकती आहेत. या मिळकतींकडून महापालिकेला दरवर्षी सुमारे ४०.४८ कोटी रुपये मिळकत कराच्या स्वरूपात प्राप्त होतात. प्रस्तावित सवलतीमुळे महापालिकेच्या उत्पन्नात अंदाजे २० कोटी रुपयांची घट होणार असली, तरी महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले.

### ७० हजारांहून अधिक महिलांना लाभ

पुणे महापालिकेच्या नोंदीनुसार शहरात ७० हजार ७७३ निवासी मिळकती महिलांच्या नावावर आहेत. या मिळकतींना ५० टक्के करसवलत लागू झाल्यास महापालिकेच्या उत्पन्नात सुमारे २० कोटी रुपयांची घट होणार असली, तरी महिलांच्या नावावर मालमत्ता नोंदणीला प्रोत्साहन मिळून त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळेल, असा विश्वास महापालिका प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# लग्नानंतर राजस्थानला जाण्याचा बेत; मित्रांचा धक्कादायक दावा

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यातील उद्योजक केतन अग्रवाल हत्याकांडाच्या तपासात दररोज नवे धागेदोरे समोर येत असून, आता मुख्य आरोपी चेतन चौधरीच्या मित्रांनी केलेल्या खुलाशांमुळे या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. लग्नानंतर राजस्थानमध्ये स्थायिक होण्याचा त्यांचा बेत होता आणि त्यासाठी लागणाऱ्या पैशांची व्यवस्था सिया गोयल तिच्या कुटुंबाकडून करणार असल्याचे चेतनने मित्रांना सांगितल्याचा दावा समोर आला आहे.**





महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पासाठी आठ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी तीन निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्यानंतर आर्थिक छाननी करण्यात आली. या प्रक्रियेत मे. एल.सी. इन्फ्रा प्रा. लि. कंपनीची निविदा अंदाजित खर्चापेक्षा सुमारे तीन टक्के कमी दराने लाभदायक ठरली. त्यामुळे महापालिकेच्या निधीची बचत होण्यासह दर्जेदार कामाची अपेक्षा व्यक्त होत आहे.

या प्रकल्पासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार आणि महापालिकेच्या संयुक्त सहभागातून सुमारे 526 कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. निविदा प्रक्रियेनंतर 430 कोटी 75 लाख 61 हजार 777 रुपयांची अंतिम निविदा स्थायी समितीने मंजूर केली आहे. या प्रकल्पाची कामाची मुदत 36 महिने निश्चित करण्यात आली असून, इंद्रायणी नदीकाठी 60 MLD क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) उभारण्यात येणार आहेत. स्थायी समितीच्या 16 सदस्यांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसचे संदीप वाघेरे आणि शिवसेनेच्या सुलभा उबाळे यांनी विरोध नोंदविला. मात्र, बहुमताने हा विषय मंजूर करण्यात आला.

प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर नदीतील प्रदूषण आणि गाळ कमी करणे, नदीकाठाचे सुशोभीकरण, हरित क्षेत्र विकसित करणे, पादचारी सुविधा निर्माण करणे तसेच जैवविविधतेचे संरक्षण यासह पर्यावरणपूरक नागरी विकासाला चालना मिळणार आहे. यामुळे नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि आकर्षक नदीकिनाऱ्याचा लाभ मिळणार असून शहराच्या शाश्वत विकासालाही बळ मिळणार आहे.

### राजस्थानमध्ये स्थायिक होण्याचा होता बेत?

चेतन चौधरीच्या मित्रांच्या म्हणण्यानुसार, तो आणि सिया गोयल विवाहानंतर राजस्थानमधील उदयपूर किंवा जोधपूर येथे स्थायिक होण्याचा विचार करत होते. त्यासाठी लागणाऱ्या पैशांची व्यवस्था सिया तिच्या कुटुंबाकडून करेल, असे चेतनने मित्रांना सांगितल्याचा दावा करण्यात आला आहे. या माहितीमुळे केतन अग्रवाल हत्याकांडाच्या तपासात आर्थिक हेतूचाही मुद्दा अधिक ठळकपणे समोर आला आहे.

### दोन्ही कुटुंबांना होती अफेअरची कल्पना?

पुणे पोलिसांच्या रिमांड रिपोर्ट आणि चौकशीतून आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. सिया आणि चेतनच्या प्रेमसंबंधांची कल्पना दोन्ही कुटुंबांना आधीपासूनच होती. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, १८ जून रोजी लोहगड किल्ल्यावर केतनची हत्या झाल्यानंतर, सियाच्या कुटुंबीयांनी स्वतः चेतनच्या कुटुंबीयांना फोन करून या घटनेची माहिती दिली होती. मात्र, तोपर्यंत या हत्येमागे सिया आणि चेतनचा हात असेल, याची पुसटशी कल्पनाही दोन्ही कुटुंबांना नव्हती.

### हत्येपूर्वीच मित्रांपासून दूर गेला चेतन?

केतन अग्रवाल यांच्या हत्येच्या सुमारे दोन ते तीन महिने आधीपासून चेतन चौधरीने मित्र, परिचित आणि समाजातील लोकांशी संपर्क जवळपास बंद केला होता, असा दावा त्याच्या मित्रांनी केला आहे. तो कोणालाही भेटत नव्हता किंवा संपर्कात राहत नव्हता. या काळातच कटाची आखणी सुरू झाली असावी, असा संशय तपासाच्या अनुषंगाने व्यक्त केला जात आहे.

# स्वयंघोषित नेत्यांना भाजपाचा दणका!

## पक्षशिस्तीला ‘चॅलेंज’ करणाऱ्यांवर ॲक्शन; ‘काम दाखवा, अन्यथा पद नाही’

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भारतीय जनता पक्षाच्या पिंपरी-चिंचवड शहर संघटनेत पक्षशिस्तीला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा निर्णायक संदेश देण्यात आला असून, पक्षाने दिलेल्या आदेशाचे पालन न करणाऱ्यांवर ‘ॲक्शन’ घेतली जाणार आहे. पक्षाच्या भूमिकेशी विरोधाभासाची भूमिका घेणे, सार्वजनिक वक्तव्ये आणि संघटनात्मक शिस्तभंग करणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शहर कोअर कमिटीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.**



### शिस्तीवर भर, कामगिरीलाच प्राधान्य

भाजपाच्या कोअर कमिटी बैठकीत पक्षशिस्त मोडणाऱ्यांवर कठोर कारवाईचा निर्णय घेण्यात आला. बूथस्तरावरील काम, संघटन विस्तार, सदस्य नोंदणी व जनसंपर्काच्या आधारे पदाधिकाऱ्यांचे मूल्यमापन होणार असून, प्रत्यक्ष काम करणाऱ्यांनाच भविष्यात पदलाभ दिला जाणार आहे.

विशेष म्हणजे, “संघटनेत कामगिरी दिसली तरच पदलाभ, अन्यथा कोणालाही सूट नाही,” असा स्पष्ट इशारा वरिष्ठ नेतृत्वाकडून देण्यात आहे. गेल्या काही महिन्यांत शहर भाजपामध्ये काही पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींकडून परस्परविरोधी वक्तव्ये, अंतर्गत मतभेद आणि संघटनेच्या निर्णयांवर उघडपणे भाष्य करण्याच्या घटनांमुळे पक्षाची प्रतिमा मलिन होत आहे. याची गंभीर दखल पक्षश्रेष्ठींनी घेलेली आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत संघटनात्मक शिस्त अधिक कडक करण्यावर एकमत झाल्याचे समजते.

भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड जिल्हयाची कोअर समितीची बैठक शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या अध्यक्षतेत संपन्न झाली. यावेळी गेल्या काही महिन्यांपासून होत असलेले पक्षाची विविध अभियाने यांचा आढावा व आगामी संघटनात्मक कार्यक्रम आणि महानगरपालिके संदर्भात विविध विषयांवर अत्यंत महत्त्वाची चर्चा या बैठकीत झाली व यावेळी काही महत्त्वाचे निर्णय देखील घेण्यात आले.

शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या बैठकीत आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे, आमदार शंकर जगताप, आमदार अमित गोरखे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनी जगताप, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, माजी जिल्हाध्यक्ष सदाशिव खाडे, सत्तारुढ पक्षनेता प्रशांत शितोळे उपस्थित होते.

बैठकीत स्पष्ट करण्यात आले की, पक्षाची अधिकृत भूमिका हीच अंतिम मानली जाईल. संघटनेच्या व्यासपीठावर चर्चा न करता सार्वजनिकरित्या भूमिका मांडणे, माध्यमांद्वारे दबावतंत्र वापरणे अथवा पक्षाच्या निर्णयांवर टीका करणे हे शिस्तभंग मानले जाईल. अशा प्रकारांना यापुढे कोणतीही मुभा दिली जाणार नसून, संबंधितांवर संघटनात्मक कारवाई केली जाईल.

यासोबतच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पदाधिकाऱ्याच्या कामाचा स्वतंत्र आढावा घेण्याचाही निर्णय झाला आहे. बूथ स्तरावरील काम, संघटन विस्तार, सदस्य नोंदणी, जनसंपर्क, सामाजिक उपक्रम आणि पक्षाने दिलेल्या जबाबदाऱ्यांची प्रभावी अंमलबजावणी या निकषांवर पदाधिकाऱ्यांचे मूल्यमापन होणार आहे. केवळ पद धारण करून चालणार नाही, तर प्रत्यक्ष कामगिरी करणाऱ्यांनाच भविष्यात संघटनेत संधी दिली जाईल, असा स्पष्ट संदेश बैठकीत देण्यात आला.

भाजपाची संघटनात्मक ताकद वाढविणे, अंतर्गत समन्वय अधिक मजबूत करणे आणि आगामी निवडणुकांसाठी सक्षम यंत्रणा उभी करणे, या उद्देशानेच हा निर्णय घेण्यात आल्याचे पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी सांगितले. त्यामुळे येत्या काळात शहर भाजपामध्ये पक्षशिस्तीबाबत अधिक कठोर भूमिका पाहायला मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

> “भारतीय जनता पक्ष ही शिस्त, संघटन आणि कार्यकर्त्यांच्या कष्टावर उभी असलेली विचारसरणी आहे. पक्षापेक्षा कोणीही मोठा नाही. संघटनेने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणाऱ्यांनाच भविष्यात संधी मिळेल. पक्षविरोधी भूमिका किंवा शिस्तभंग कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही.”
>
> **- शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

विशेष म्हणजे, महापालिकेतील महत्वाची पदे, स्वीकृत सदस्य नियुक्ती आणि प्रभागस्तरीय स्वीकृत सदस्यांची नियुक्तीचे अधिकार स्थानिक पातळीवर घेण्यात येणार आहेत. त्यासाठी पक्ष संघटनेचे कार्य आणि पक्षाच्या नियमांच्या चौकटीतून राहून काम दाखवावे लागणार आहे. “हम करें सो कायदा...” अशी भूमिका घेणाऱ्या स्वयंघोषित नेत्यांना चाप लावण्यात आला आहे. त्याची जबाबदारी स्थानिक पक्षश्रेष्ठींनी नेतृत्त्वाकडे सोपवण्यात आली आहे.

---

# “नमामी इंद्रायणी” : नदी सुधार प्रकल्पाला स्थायी समितीची मंजुरी!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या पर्यावरणीय विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या ‘नमामी इंद्रायणी’ अर्थात इंद्रायणी वॉटर बॉडी सर्वांगीण पुनरुज्जीवन प्रकल्पाला स्थायी समितीची मंजुरी मिळाली आहे. अमृत 2.0 योजनेअंतर्गत सुमारे 430.75 कोटी रुपयांच्या या प्रकल्पामुळे इंद्रायणी नदीचे प्रदूषण कमी करणे, जलगुणवत्ता सुधारणे, नदीकाठाचे संवर्धन आणि पर्यावरणपूरक नदीकिनारा विकसित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**



> ““नमामी इंद्रायणी’ प्रकल्प हा पिंपरी-चिंचवडच्या पर्यावरणीय भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. या प्रकल्पामुळे इंद्रायणी नदीचे प्रदूषण कमी होऊन जलगुणवत्तेत सुधारणा होईल. नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक नदीकिनारा उपलब्ध करून देण्यासाठी दर्जेदार व वेळेत काम पूर्ण करण्यास स्थायी समिती कटिबद्ध आहे.”
>
> **- अभिषेक बारणे, अध्यक्ष, स्थायी समिती.**

> “इंद्रायणी नदी ही आपल्या सांस्कृतिक, धार्मिक आणि पर्यावरणीय वारशाचा अविभाज्य भाग आहे. या नदीचे पुनरुज्जीवन हे केवळ विकासाचे काम नसून, भावी पिढ्यांसाठी स्वच्छ आणि समृद्ध पर्यावरण निर्माण करण्याचा संकल्प आहे. अमृत 2.0 अंतर्गत इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला स्थायी समितीची मंजुरी मिळाल्याने या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या प्रकल्पामुळे नदीचे प्रदूषण कमी होईल, जलगुणवत्तेत सुधारणा होईल, जैवविविधतेचे संवर्धन होईल आणि नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित व आकर्षक नदीकिनारा उपलब्ध होईल. राज्य शासन, महापालिका आणि सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून हा प्रकल्प गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि निर्धारित मुदतीत पूर्ण व्हावा, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. लवकरच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पासाठी आठ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी तीन निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्यानंतर आर्थिक छाननी करण्यात आली. या प्रक्रियेत मे. एल.सी. इन्फ्रा प्रा. लि. कंपनीची निविदा अंदाजित खर्चपेक्षा सुमारे तीन टक्के कमी दराने लाभदायक ठरली. त्यामुळे महापालिकेच्या निधीची बचत होण्यासह दर्जेदार कामाची अपेक्षा व्यक्त होत आहे.

या प्रकल्पासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार आणि महापालिकेच्या संयुक्त सहभागातून सुमारे 526 कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. निविदा प्रक्रियेनंतर 430 कोटी 75 लाख 61 हजार 777 रुपयांची अंतिम निविदा स्थायी समितीने मंजूर केली आहे. या प्रकल्पाची कामाची मुदत 36 महिने निश्चित करण्यात आली असून, इंद्रायणी नदीकाठी 60 MLD क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) उभारण्यात येणार आहेत. स्थायी समितीच्या 16 सदस्यांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसचे संदीप वाघेरे आणि शिवसेनेच्या सुलभा उबाळे यांनी विरोध नोंदविला. मात्र, बहुमताने हा विषय मंजूर करण्यात आला.

प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर नदीतील प्रदूषण आणि गाळ कमी करणे, नदीकाठाचे सुशोभीकरण, हरित क्षेत्र विकसित करणे, पादचारी सुविधा निर्माण करणे तसेच जैवविविधतेचे संरक्षण यासह पर्यावरणपूरक नागरी विकासाला चालना मिळणार आहे. यामुळे नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि आकर्षक नदीकिनाऱ्याचा लाभ मिळणार असून शहराच्या शाश्वत विकासालाही बळ मिळणार आहे.



## भूमिका

**अयोध्येतील श्रीराम मंदिर हे कोट्यवधी भारतीयांच्या श्रद्धेचे, विश्वासाचे आणि सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक आहे. अशा पवित्र स्थळातील दानपेटीतून झालेल्या कथित चोरीच्या प्रकरणाने देशभरातील रामभक्तांना मोठा धक्का दिला आहे.**

# रामधनाची लूट आणि श्रद्धेचा प्रश्न



मंदिराच्या उभारणीसाठी भाविकांनी मनापासून दिलेल्या देणग्यांवरच डल्ला मारल्याचा आरोप अत्यंत गंभीर असून, तो केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून श्रद्धेवरील आघात मानला जात आहे.

तपास यंत्रणांनी काही संशयितांना अटक केली असून, त्यांच्या ताब्यातून मोठ्या प्रमाणात मालमत्ता आणि आर्थिक व्यवहार समोर आले आहेत. यामुळे या प्रकरणाची व्याप्ती किती मोठी असू शकते, याची चर्चा सुरू झाली आहे. मात्र, या संपूर्ण प्रकरणाचा निष्पक्ष, पारदर्शक आणि सखोल तपास होणे हीच काळाची गरज आहे. दोषी कोणताही असो, त्याच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई झाली पाहिजे. कारण मंदिरावरील भक्तांचा विश्वास टिकवणे ही सर्व संबंधितांची जबाबदारी आहे.

या घटनेनंतर राजकीय आरोप-प्रत्यारोपांनाही वेग आला आहे. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर टीका करत असले, तरी हा विषय केवळ राजकारणापुरता मर्यादित नाही. मंदिर व्यवस्थापनातील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि आर्थिक शिस्त यांचा हा प्रश्न आहे. त्यामुळे या प्रकरणाला धार्मिक किंवा राजकीय रंग देण्याऐवजी सत्य समोर आणण्यावर भर देणे अधिक आवश्यक आहे.

श्रीराम मंदिर हे एका पक्षाचे किंवा संस्थेचे नसून संपूर्ण देशाच्या श्रद्धेचे केंद्र आहे. त्यामुळे मंदिराच्या व्यवस्थापनावर जनतेचा विश्वास अबाधित राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी देणगी व्यवस्थापन अधिक आधुनिक, डिजिटल आणि पारदर्शक करण्याची गरज आहे. नियमित लेखापरीक्षण, सीसीटीव्ही देखरेख, स्वतंत्र निरीक्षण यंत्रणा आणि उत्तरदायित्वाची प्रभावी अंमलबजावणी यामुळे अशा गैरप्रकारांना आळा बसू शकतो.

रामायणातील प्रभू श्रीराम हे न्याय, सत्य आणि धर्मनिष्ठेचे प्रतीक मानले जातात. त्यांच्या नावाने उभारलेल्या मंदिरात जर आर्थिक गैरव्यवहाराच्या छाया पडत असतील, तर त्या दूर करण्याची जबाबदारीही त्याच मूल्यांनुसार पार पाडली गेली पाहिजे. या प्रकरणात सत्य लवकरात लवकर समोर येणे, दोषींना शिक्षा होणे आणि मंदिर व्यवस्थापनावरील श्रद्धा पुन्हा दृढ होणे, हीच देशातील कोट्यवधी रामभक्तांची अपेक्षा आहे. श्रद्धेचा पाया विश्वासावर उभा असतो आणि तो टिकवण्यासाठी पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि उत्तरदायित्व यांना पर्याय नाही.

## प्रासंगिक »

### धनाचा विनियोग

**धन हे माणसाच्या जीवनातील महत्त्वाचे साधन असले, तरी त्याचा योग्य विनियोग झाला तरच त्याचे खरे महत्त्व सिद्ध होते.**

केवळ संपत्ती जमवत राहणे, तिचे रक्षण करण्यात आयुष्य घालवणे आणि तिचा स्वतःसाठी किंवा समाजासाठी उपयोग न करणे, याला काहीही अर्थ राहत नाही. अशी संपत्ती मालकाच्या आयुष्यातही आनंद निर्माण करू शकत नाही आणि इतरांच्या जीवनातही कोणताही सकारात्मक बदल घडवू शकत नाही.

माणसाने आपल्या कष्टाने मिळविलेल्या धनाचा उपयोग स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी तसेच गरजू आणि समाजहिताच्या कार्यासाठी केला, तरच त्या धनाचे सार्थक होते. दान, परोपकार आणि सत्कारणी लावलेली संपत्तीच माणसाला खरी समाधानाची अनुभूती देते. अन्यथा, फक्त संचय केलेले धन शेवटी निरुपयोगी ठरते.

- तात्पर्य : धनाची खरी किंमत त्याच्या संचयात नसून, योग्य वेळी योग्य कारणासाठी केलेल्या उपयोगात आणि समाजहितासाठी केलेल्या विनियोगात असते.

**शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) प्रश्नपत्रिका फुटीची घटना ही केवळ एका परीक्षेपुरती मर्यादित नाही. ती देशातील परीक्षा व्यवस्थेतील गंभीर त्रुटी पुन्हा एकदा अधोरेखित करणारी आहे. 'नीट' परीक्षेतील गैरप्रकारानंतर अवघ्या काही महिन्यांत टीईटीची प्रश्नपत्रिका फुटल्याने लाखो उमेदवारांचा विश्वास डळमळीत झाला आहे.**

# परीक्षा व्यवस्थेचीच परीक्षा!



विशेष म्हणजे, ज्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा आणि नैतिकतेचे धडे द्यायचे, त्यांची पात्रता ठरवणाऱ्या परीक्षेलाच भ्रष्टाचाराची लागण होणे अधिक चिंताजनक आहे.

टीईटीचा उद्देश केवळ शैक्षणिक ज्ञान तपासणे नसून, अध्यापन कौशल्य, बालमानसशास्त्राचे आकलन आणि शिक्षक म्हणून आवश्यक असलेल्या क्षमतांची पडताळणी करणे हा आहे. मात्र, परीक्षा जसजशी उच्च जोखमीची बनते, तसतसे 'कोणत्याही मार्गाने यश' मिळविण्याचे प्रयत्न वाढतात. त्यातूनच पेपरफुटीसारखे गैरप्रकार घडतात. दोषींना शिक्षा होणे आवश्यक आहेच; परंतु प्रत्येक वेळी केवळ आरोपींना अटक करून प्रश्न सुटत नाही. परीक्षा सुरक्षेतील त्रुटींसाठी संबंधित यंत्रणांनाही जबाबदार धरण्याची वेळ आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार हजारो कार्यरत शिक्षकांसाठी टीईटी उत्तीर्ण होणे अनिवार्य झाले आहे. त्यामुळे परीक्षेवरचा ताण मोठ्या प्रमाणात वाढला आहे. कमी निकालाचे प्रमाण, मर्यादित संधी आणि नोकरी टिकविण्याची धास्ती यामुळे काही जण अनैतिक मार्ग स्वीकारण्याचा मोह करू शकतात. मात्र, याच कारणामुळे परीक्षा अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्याची जबाबदारी शासनावर अधिक वाढते.

यासोबतच टीईटीच्या स्वरूपाचाही पुनर्विचार होणे गरजेचे आहे. बहुपर्यायी प्रश्नांमधून शिक्षकाची अध्यापन क्षमता, विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याचे कौशल्य किंवा बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगातील शिक्षण पद्धतीचे आकलन कितपत मोजता येते, हा प्रश्न आहे. आजच्या डिजिटल युगात शिक्षकांच्या गुणवत्तेचे मूल्यमापन अधिक व्यापक आणि व्यवहार्य पद्धतीने करण्याची गरज आहे.

पेपरफुटीची प्रत्येक घटना ही केवळ एका परीक्षेचे अपयश नसते, तर संपूर्ण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असते. त्यामुळे दोषींवर कठोर कारवाईसोबतच परीक्षा प्रक्रियेत आधुनिक सुरक्षा प्रणाली, डिजिटल देखरेख आणि जबाबदारी निश्चित करणारी प्रभावी यंत्रणा उभारणे ही काळाची गरज आहे. अन्यथा, प्रश्नपत्रिका फुटत राहतील आणि त्यासोबतच विद्यार्थ्यांचा व समाजाचा व्यवस्थेवरील विश्वासही तुटत राहील.

## ।। अभंगवाणी ।।



आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा ।
म्हणोनि व्यभिचारा टेकलियें ॥१॥

रात्रंदिस मज पाहिजे जवळी ।
क्षण त्यानिराळी न गमे घडी ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सचिन अहिरांनंतर ठाकरे गटाला आणखी धक्का?

## सुनील शिंदेंच्या शिंदेसेना प्रवेशाची चर्चा; राज्यात पुन्हा पक्षांतराच्या राजकारणाला वेग



**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यातील राजकीय घडामोडींना पुन्हा वेग आला असून, ठाकरे गटातील आणखी एक आमदार शिंदे गटाच्या वाटेवर असल्याच्या चर्चांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे. दुसरीकडे, शिंदेसेनेत प्रवेश केल्यानंतर सचिन अहिर यांची विधानपरिषदेच्या उपसभापतीपदी बिनविरोध निवड झाली आहे. दरम्यान, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत आणि काँग्रेसनेही विविध मुद्द्यांवरून सत्ताधाऱ्यांवर टीका केली आहे.**

ठाकरे गटाचे विधानपरिषदेचे आमदार सुनील शिंदे शिंदेसेनेत प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यांच्यासोबत ठाकरे गटातील आणखी काही आमदारही पक्षांतर करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. मात्र, सुनील शिंदे यांनी या वृत्तांचे स्पष्टपणे खंडन करत, आपल्या विरोधकांकडून जाणीवपूर्वक अफवा पसरवल्या जात असल्याचे म्हटले आहे.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर सचिन अहिर यांची विधानपरिषदेच्या उपसभापतीपदी बिनविरोध निवड झाली. महायुतीने त्यांना उमेदवारी दिल्यानंतर ठाकरे गटाचे उमेदवार जगन्नाथ अभ्यंकर यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने अहिर यांचा मार्ग मोकळा झाला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांचे आभार मानले.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ठाण्यात पत्रकार परिषद घेत राज्यातील फोडाफोडीच्या राजकारणावर भाजपावर जोरदार टीका केली. आमदार-खासदारांच्या पक्षांतराच्या राजकारणावर भाष्य करत त्यांनी, सत्तेच्या बळावर सुरू असलेले हे राजकारण भविष्यात भाजपलाच महागात पडेल, असा इशारा दिला.

याचवेळी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी सचिन अहिर यांच्यावर निशाणा साधला. आदित्य ठाकरे यांनी राजकीय संधी देऊनही अहिर यांनी पक्ष सोडल्याची खंत व्यक्त करत, त्यांच्या राजकीय प्रवासावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

दुसरीकडे, नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमात केलेल्या भाषणावरून काँग्रेसने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केले आहे. सेवा नियमांचे पालन झाले का, संबंधित कार्यक्रमासाठी शासनाची पूर्वपरवानगी घेण्यात आली होती का आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या राजकीय तटस्थतेबाबत सरकारची भूमिका काय आहे, असे प्रश्न काँग्रेसने उपस्थित केले आहेत. राज्यातील या घडामोडींमुळे आगामी काळात राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

### सुनील शिंदेंकडून पक्षांतराच्या चर्चेला पूर्णविराम?


ठाकरे गटाचे आमदार सुनील शिंदे यांनी शिंदेसेनेत प्रवेश करणार असल्याच्या चर्चांचे स्पष्टपणे खंडन केले आहे. राजकीय हेतूने आणि पक्षात संभ्रम निर्माण करण्यासाठी काही हितशत्रूंकडून जाणीवपूर्वक अशा अफवा पसरवल्या जात असल्याचा आरोप त्यांनी केला. आपण उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतच ठाम असून पक्षांतराच्या चर्चांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या चर्चांना अधिकृत दुजोरा मिळालेला नसून, राजकीय वर्तुळात मात्र या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

# 'नागपूरकरांचा विश्वास जिंकणार, गुन्हेगारांवर वचक बसवणार'

**महाईन्यूज । नागपूर**

**नागपूरचे नवनियुक्त पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी शहरातील गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रणासाठी आधी संपूर्ण शहराचा सखोल अभ्यास करून त्यानंतर ठोस रणनीती आखणार असल्याचे स्पष्ट केले आहे. शहरातील गुन्हेगारीचे स्वरूप, संवेदनशील भाग आणि कायदा-सुव्यवस्थेच्या आव्हानांचा अभ्यास करून त्यानुसार कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले.**



पदभार स्वीकारल्यानंतर गेल्या दोन दिवसांपासून शहराचा नकाशा समोर ठेवून संवेदनशील भागांचा अभ्यास आणि मायक्रो ऑब्झर्वेशन सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

शहरातील गुन्हेगारीचे स्वरूप, गुन्ह्यांचे हॉटस्पॉट आणि पोलिस यंत्रणेपुढील आव्हानांचा सखोल आढावा घेतल्यानंतर त्यानुसार कृती आराखडा तयार करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांचे शहर म्हणून ओळख असलेल्या नागपुरात व्हीव्हीआयपी हालचाली मोठ्या प्रमाणात असतात. त्याचबरोबर ड्रग्ज तस्करी, बुकी, हवाला व्यवहार, अवैध हुक्का पार्लर आणि वाढते रस्त्यावरील गुन्हे या गंभीर समस्या असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या सर्व प्रकारांवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिस यंत्रणा अधिक सक्रियपणे काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

समुदाय सहभागाला महत्त्व देत मुंबईतील 'जागरूक मुंबईकर' उपक्रमाच्या धर्तीवर नागपुरात 'जागरूक नागपूरकर' अभियान सुरू करण्याचाही मानस त्यांनी व्यक्त केला. नागरिकांचा विश्वास संपादन करून त्यांना पोलिस यंत्रणेचा भाग बनविल्यास गुन्हेगारी रोखणे आणि कायदा-सुव्यवस्था राखणे अधिक प्रभावी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, पदभार स्वीकारल्यानंतर पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना नांगरे पाटील यांनी पोलिस दलातील भ्रष्टाचाराविरोधात कठोर भूमिका घेतली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाई होईल, अशी वेळ येणार नाही याची प्रत्येकाने काळजी घ्यावी, असे त्यांनी स्पष्टपणे बजावले.

मात्र, या सूचनेनंतर अवघ्या २४ तासांतच गणेशपेठ पोलिस ठाण्यातील एका कर्मचाऱ्याला लाच स्वीकारल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आल्याची घटना समोर आली. त्यामुळे पोलिस दलातील भ्रष्टाचाराविरोधातील नव्या पोलिस आयुक्तांच्या भूमिकेची पहिलीच कसोटी लागल्याची चर्चा सुरू झाली आहे.

### २४ तासातच तडा

सोमवारी पोलिस आयुक्तांनी पदभार स्विकारल्यानंतर मंगळवारी त्यांनी पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना पोलिस दलातील भ्रष्टाचाराची किड संपवण्यासंबंधाने मार्गदर्शन केले. लाच स्विकारण्याचे प्रकार अर्थात एसीबीची कारवाई होणार नाही, याची कटाक्षाने खबरदारी घ्या, असे आवाहनही केले. त्याला २४ तास व्हायचे असतानाच आज सायंकाळी पोलिस आयुक्तालयातील अधिकाऱ्यांच्या मोबाईलवर एक मेसेज आदळला. गणेशपेठ पोलिस ठाण्यातील एका कर्मचाऱ्याला लाच घेण्याच्या आरोपात पकडण्यात आल्याच्या कारवाईचा हा मेसेज होता.

# तमिळनाडूत TVKचे सरकार पाडण्याचा कट

## आमदारांना ३५ कोटींची ऑफर, द्रमुक नेत्याचे नाव आल्याने खळबळ; तिघांना अटक

**महाईन्यूज । तमिळनाडू**

**दोन महिन्यांपूर्वी तमिळनाडूत स्थापन झालेल्या जोसेफ विजय यांचे सरकार पाडण्याचा कट रचण्यात आल्याचा खळबळजनक दावा केला जात आहे. तमिळनाडू राज्य सरकारच्या गुप्तहेर विभागाने टीव्हीके सरकार अस्थिर करण्याचा कट हाणून पाडल्याची माहिती समोर आली आहे. जोसेफ विजय यांचे सरकार अडचणीत आणण्यासाठी टीव्हीकेच्या १५ आमदारांना राजीनामा देण्यासाठी फूस लावणे या कटाचा भाग होते, असे वृत्त सूत्रांच्या हवाल्याने एनडीटीव्हीने प्रसिद्ध केले आहे.**



जोसेफ विजय यांचे सरकार अस्थिर करण्यासाठी प्रयत्न केला जात असल्याची माहिती मिळताच, टीव्हीकेच्या एका आमदाराने पोलिस तक्रार केली. कटाच्या आरोपानुसार तपास यंत्रणांकडून तपास सुरु करण्यात आला व एका सल्लागार संस्थेच्या कर्मचाऱ्याला अटक करण्यात आली. तपासादरम्यान, या कटाचे धागेदोरे डीएमके आमदार सेंथिल बालाजी यांच्यापर्यंत पोहोचत असल्याचे उघडकीस आल्याचे सांगितले जात आहे. या कथित कटात सामिल असलेल्या आणखी दोघांना अटक करण्यात आली असून, त्यांची देखील चौकशी केली जात आहे.

अटक करण्यात आलेला एक व्यक्ती डीएमके आमदार सेंथिल बालाजी आणि त्यांचा भाऊ अशोक यांच्या जवळचा असल्याचे समोर आले आहे. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर टीव्हीकेचे आमदार मंत्री निर्मल कुमार यांनी डीएकेवर टीका केली. "बालाजी आणि करुर गँगचा याच्याशी थेट संबंध आहे. पोलिसांनी याप्रकरणी कायदेशीर कारवाई करुन सर्वांना अटक करावी", अशी मागणी कुमार यांनी केली. द्रमुकने आण्णाद्रमुक प्रमुख एडप्पाडी के पलानीस्वामी यांच्याबरोबर संगनमत करून विजय यांच्या नेतृत्वाखालील सरकार पाडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला.

या प्रकरणी टीव्हीके सरकारचे मंत्री निर्मल कुमार यांनी थेटपणे करूर गँगच्या लोकांचा यात सहभाग आहे असा आरोप केला आहे. सेंथिल बालाजीशी निगडित लोकांवर पोलिसांनी कायदेशीर कारवाई करायला हवी. त्यातील लोकांना अटक करायला हवी अशी मागणी त्यांनी केली. डिएमके नेते एम.के स्टॅलिन आणि उदयनिधी यांच्या सांगण्यावरून सेंथिल बालाजी आमदारांशी संपर्क करत आहे आणि त्यांना १० कोटी ते ५० कोटींपर्यंत ऑफर दिली जात आहे. डीएमके आणि एआयएडीएमके प्रमुख एडप्पाडी के. पलानीस्वामी हे एकत्रितपणे 'मागच्या दाराने' विजय यांचे सरकार पाडण्याचा प्रयत्न करत आहेत असा दावा त्यांनी केला.

### ३५ कोटी रुपयांची ऑफर दिल्याचा दावा

चेन्नईतून एकाला आणि इतर दोघांना करुरमधून अटक करण्यात आली आहे. सरकार पाडण्यासाठी कथित कटाचा अधिकारी तपास करत असून, याचे धागेदोरे कुठपर्यंत जातात याचा देखील तपास केला जात आहे. उथंगराईचे टीव्हीके आमदार एन. एलैयाराजा यांनी चेन्नई पोलिसांत याप्रकरणी तक्रार दाखल केली आहे. तामिळनाडू विधानसभेचे अध्यक्ष जेसीडी प्रभाकर यांच्या विरोधात अविश्वास ठरावाला पाठिंबा देण्यासाठी ३५ कोटी रुपयांची ऑफर आयपीडीएस या सल्लागार कंपनीतील एका व्यक्तीने दिल्याचा आरोप एलैयाराजा यांनी केला आहे. यानंतर धमकी देण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

### डीएमकेचे टीव्हीकेला आव्हान

टीव्हीकेच्या अनेक आमदारांना पक्षांतर करण्यासाठी पैशांची ऑफर देण्यात आली, असा दावाही कुमार यांनी केला. सर्वच आमदारांना विचारण्यात आले आणि त्यांना १०, २० ते ५० कोटींची ऑफर देण्यात आल्याचा दावा कुमार यांनी केला. दरम्यान, डीएमकेकडून या आरोपांचे खंडन करताना टीव्हीके नरेटीव्ही तयार करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला. टीव्हीके सरकारकडे सबळ पुरावे असतील तर त्यांनी सेंथिल बालाजी यांना अटक करुन दाखवावी असे आव्हान देखील डीएमके प्रवक्ते ए. सरवानन यांनी दिले. जोसेफ विजय यांच्या करुर येथील रॅलीत झालेल्या चेंगराचेंगरीत काही नागरिकांचा मृत्यू झाला होता.

# बहुमत नाही, तरीही सरकार...! मेलोनींनी आणला असा फॉर्म्युला

**महाईन्यूज । इटली**

**इटलीमध्ये पुढील वर्षी सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. मात्र, या निवडणुकांआधीच तिथल्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी एक अशी राजकीय खेळी खेळली आहे, ज्याने संपूर्ण देशाच्या निवडणूक व्यवस्थेत खळबळ उडवून दिली आहे. मेलोनी यांनी संसदेत एक नवा निवडणूक प्रस्ताव आणला आहे.**



मेलोनी यांच्या मते, इटलीतील राजकीय अस्थिरता संपवण्यासाठी हा निर्णय गरजेचा आहे; तर दुसरीकडे विरोधकांनी याला मेलोनींचा हुकूमशाही अजेंडा म्हटले आहे.

इटलीमध्ये राजकीय स्थैर्य आणण्यासाठी मेलोनी यांनी 'प्रपोर्शनल रिप्रेझेंटेशन' व्यवस्थेचा प्रस्ताव दिला आहे. यातील सर्वात धक्कादायक आणि महत्त्वाचा नियम म्हणजे 'मेजोरिटी प्राइज' म्हणजेच 'बोनस जागा'. या नियमानुसार, निवडणुकीत ज्या आघाडीला किंवा युतीला सर्वात जास्त मतं मिळतील, त्यांना बोनस म्हणून काही जागा जास्तीच्या दिल्या जातील. यामुळे त्या आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाले नसले, तरीही ते सहज सरकार स्थापन करू शकतील आणि ५ वर्षे सत्ता चालवू शकतील.

इटलीची निवडणूक पद्धत भारताइतकी सरळ आणि सोपी नाही, ती बरीच क्लिष्ट आहे. भारताप्रमाणेच इटलीतही दोन सभागृहे आहेत. कनिष्ठ सभागृहाला 'चेंबर ऑफ डिप्टीज' (४०० जागा) आणि वरिष्ठ सभागृहाला 'सीनेट' (२०० जागा) म्हटले जाते.

येथे सर्व जागांवर थेट जनता मतदान करत नाही. केवळ ३७% (१४७ जागांवर) थेट निवडणूक होते. उर्वरित जागांचे वाटप थेट निवडणुकीत मिळालेल्या मतांच्या टक्केवारीनुसार (प्रमाणानुसार) केले जाते. उदाहरणार्थ, २०२२ च्या निवडणुकीत मेलोनी यांच्या आघाडीला ४३.७९% मतं मिळाली होती, ज्यामुळे त्यांना थेट निवडणुकीत १२१ आणि या टक्केवारीच्या जोरावर बोनस म्हणून ११४ जागा मिळाल्या होत्या. सध्या त्यांच्याकडे २३७ जागांचे बहुमत आहे.

### मेलोनींचा फायदा की विरोधकांची भीती?

हा कायदा पास करण्यासाठी इटलीच्या संविधानात बदल करावा लागेल. 'YOUTREND' या पोलिंग फर्मच्या एका सर्वेक्षणात असे समोर आले आहे की, पुढील निवडणुकीत कोणत्याही एका आघाडीला स्पष्ट बहुमत मिळण्याची शक्यता नाही. मात्र, मेलोनींची दक्षिणपंथी आघाडी सर्वात पुढे असेल. जर हा नवा कायदा लागू झाला, तर मेलोनी यांना केवळ ४% मतांची आघाडी मिळूनही बोनस जागांच्या जोरावर ४०० पैकी २४२ जागा मिळतील आणि त्या पुन्हा सहज सत्तेवर येतील.

# आरशात स्वतःला पाहून रडली होती ‘आनंदी’



बालिका वधू’ मालिकेतून घराघरात आनंदी म्हणून ओळख मिळवणारी अभिनेत्री अविका गौर आज तिचा वाढदिवस साजरा करत आहे. बालकलाकार म्हणून करिअरची सुरुवात करणाऱ्या अविकाने अभिनयासोबतच तिच्या फिटनेस ट्रान्सफॉर्मेशनमुळेही अनेकांची मने जिंकली आहेत. एकेकाळी वाढलेल्या वजनामुळे ती स्वतःवर नाराज झाली होती. इतकेच नव्हे, तर आरशात स्वतःला पाहून ती रडलीही होती. मात्र त्यानंतर तिने स्वतःला बदलण्याचा निर्धार केला आणि तब्बल १३ किलो वजन कमी करत प्रेरणादायी प्रवास पूर्ण केला. अविकाने काही वर्षांपूर्वी सोशल मीडियावर तिच्या फिटनेस प्रवासाबद्दल मनमोकळेपणाने सांगितले होते. तिने लिहिले होते की, एका रात्री ती आरशासमोर उभी राहिली आणि स्वतःचे वाढलेले वजन पाहून तिला रडू कोसळले. हात-पाय सुटलेले, पोट वाढलेले आणि स्वतःच्या आरोग्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याची जाणीव तिला झाली. अविकाच्या मते, जर वजन वाढण्यामागे थायरॉईड किंवा पीसीओडीसारखी वैद्यकीय समस्या असती, तर ती वेगळी गोष्ट होती.





# माळीणची गोष्ट मोठ्या पडद्यावर

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील माळीण गावावर कोसळलेल्या भीषण नैसर्गिक आपत्तीची हृदयद्रावक सत्यकथा आता रुपेरी पडद्यावर पाहायला मिळणार आहे. २०१४ मध्ये अतिवृष्टीमुळे संपूर्ण गाव दरडीखाली गाडले गेले आणि अनेक कुटुंबांचे आयुष्य एका क्षणात उद्ध्वस्त झाले. या अंगावर शहारे आणणाऱ्या सत्यघटनेवर आधारित ‘एक होतं माळीण’ हा मराठी चित्रपट येत्या २४ जुलैपासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होत आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर सोशल मीडियावर प्रदर्शित झाला असून त्याला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या चित्रपटाची निर्मिती ड्रीम डॉट क्रिएशन प्रोडक्शनच्या संतोष जगन्नाथ म्हात्रे यांनी केली असून रुपेश राणे, अरुण कोंजे, दत्तात्रय गायकर आणि राजू राणे हे सहनिर्माते आहेत. रॅन स्टुडिओज प्रोडक्शनतर्फे नंदू मेहेर, रुपेश राणे, अरुण कोंजे, अक्षय म्हात्रे आणि राजू राणे यांनी चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. चित्रपटाची संकल्पना, कथा आणि पटकथा राजू राणे यांची असून दत्तात्रय गायकर आणि राजू राणे यांनी लेखन, संवाद आणि दिग्दर्शनाची जबाबदारी सांभाळली आहे. चित्रपटात प्रशांत मोहिते, अश्विनी कासार, अभिजित श्वेतचंद्र, सिद्धी पाटणे, अनिल नगरकर, प्रशांत तपस्वी, रामचंद्र धुमाळ, अक्षय म्हात्रे, दीपज्योती नाईक आणि अनुज ठाकरे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. चित्रपटाचे छायांकन राजा फडतरे यांनी केले असून युवराज गोंगले यांनी गीतलेखनासह संगीत दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे. अजय गोगावले, जावेद अली, आनंदी जोशी आणि हरिदास शिंदे यांच्या आवाजातील गाणी चित्रपटाला भावनिक उंची देतात. कला दिग्दर्शन नितेश नांदगावकर, व्हीएफएक्स रहमान अब्दुल्ला, तर कार्यकारी निर्माते महेश भारंबे आहेत. विशेष म्हणजे, हा चित्रपट वास्तवाशी प्रामाणिक राहावा यासाठी दिग्दर्शक राजू राणे यांनी माळीण गावातील ग्रामस्थांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या अनुभवांच्या आधारे कथानक उभे केले आहे.

# ‘स्वतःची कबर खणायला घ्या’ सना खानची पोस्ट चर्चेत



अभिनेत्री सना खान (Sana Khan) हिने बॉलिवूडला रामराम केला आहे. तिने 2020 मध्ये बॉलिवूडला निरोप दिला आणि मुफ्ती अनस सय्यद याच्यासोबत लग्न केलं. लग्नानंतर सना हिने तिचा संपूर्ण वेळ फक्त कुटुंबाला देण्याचा निर्णय घेतला. लग्नानंतर सनाने दोन मुलांना जन्म दिला. सना आज बॉलिवूडमध्ये सक्रिय नसली तरी, सोशल मीडियावर कायम सक्रिय असते. नुकतेच तिने सोशल मीडियावर शेअर केलेला व्हिडिओ चर्चेत आला आहे. सना खान व्हिडिओमध्ये म्हणते की, ‘तुम्हाला खरंच वाटतं का? की तुमच्या मृत्यूनंतर, तुमची मुलं, तुमचे नातेवाईक, तुमचं कुटुंब, तुमचे मित्र... तुमच्यासाठी कुराण पठण करून तुम्हाला माफ करतील? ही मुलं, जी तुम्ही सांगितल्यावर प्रार्थनासुद्धा करत नाहीत, हे नातेवाईक तुमच्यासाठी प्रार्थना करतील का? हे मित्र, ज्यांच्यासोबत इतर चर्चा केल्यास तुमची चेष्टा करतात, ते तुमच्यासाठी सूरह फातिहा वाचतील का? हे भाऊ-बहीण, जे ईदच्या दिवशीही तुमची आठवण काढत नाहीत, ते तुमच्यासाठी दानधर्म करतील का?’ ‘निष्पाप लोकांनो, प्रामाणिकपणाचं युग संपलंय. प्रलय जवळ येत आहे. सर्वत्र भ्रष्टाचाराचं वातावरण आहे. तुमची स्वतःची कबर खणायला घ्या. इथे लोक जिवंत लोकांनाच विसरतात, तर मृत्यूनंतर काय लक्षात ठेवणार? प्रत्येकजण विसरतो. तुमच्या स्वतःच्या कबरीची, तुमच्या स्वतःच्या मृत्यूनंतरच्या आयुष्याची तयारी करा. आजच सुरुवात करा.’ सना खानच्या या व्हिडिओमुळे चाहतेही गोंधळात सापडले आहे.



# हर्षित राणा विरुद्ध वैभव सूर्यवंशी

## नेट्समध्ये 'हाय-व्होल्टेज' थरार! हर्षित राणा भडकला, वैभवनेही दाखवला आक्रमक तोरा

**महाईन्यूज । लंडन**

**आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघाची घोषणा झाल्यापासून क्रिकेट चाहत्यांमध्ये कमालीची उत्सुकता पाहायला मिळत आहे. या उत्सुकतेचे मुख्य कारण म्हणजे अवघ्या १५ वर्षांचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी. आयपीएल २०२६ मधील आपल्या धमाकेदार कामगिरीच्या जोरावर वैभवने पहिल्यांदाच राष्ट्रीय संघात स्थान मिळवले आहे. मात्र, नुकत्याच आयर्लंडविरुद्ध झालेल्या दोन सामन्यांच्या टी२० मालिकेत त्याला पदार्पणाची संधी मिळाली नव्हती; या मालिकेत भारताला ०-२ अशा लाजिरवाणा पराभव स्वीकारावा लागला होता.**




आता भारतीय संघाचा सामना इंग्लंडविरुद्ध होणार असून, ५ सामन्यांच्या या टी२० मालिकेतील पहिला सामना बुधवारी (१ जुलै) चेस्टर-ले-स्ट्रीट येथे खेळवला जात आहे. या मालिकेसाठी भारतीय खेळाडू मैदानावर प्रचंड घाम गाळताना दिसत आहेत. युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीने देखील नेट प्रॅक्टिसदरम्यान भारतीय संघातील प्रमुख गोलंदाजांचा धैर्याने सामना करत कसून सराव केला.

वैभव सूर्यवंशीला अद्याप आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्याची संधी मिळालेली नसली, तरी तो आपल्या तयारीत कोणतीही कसर सोडत नाहीये. इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या टी२० सामन्यात त्याला अंतिम अकरा (PLAYING XI) खेळाडूंमध्ये स्थान मिळणार की नाही, याबाबत अनिश्चितता असली, तरी नेट्समध्ये वैभवने आपल्या फलंदाजीची चमक दाखवून दिली. सरावादरम्यान त्याने काही स्थानिक वेगवान गोलंदाजांसह भारताचे मुख्य पेसर्स अर्शदीप सिंग, प्रसिद्ध कृष्णा आणि हर्षित राणा यांच्या गोलंदाजीचा सामना केला.

व्हिडिओच्या शेवटच्या भागात, हर्षित राणाविरुद्ध ऑन-साइडला मोठा शॉट मारण्याच्या प्रयत्नात वैभवचा टायमिंग चुकला. या चेंडूवर हुकमी शॉट न बसल्यानंतर हर्षित आणि वैभव यांच्यात पुन्हा एकदा मैदानावर काही तीव्र शब्द सुचवले गेल्याचे दिसून आले, ज्याची सध्या क्रिकेट वर्तुळात मोठी चर्चा सुरू आहे.

### नेट्समध्ये हर्षित राणासोबत रंगली 'शाब्दिक चकमक'

या सराव सत्रादरम्यान वैभव सूर्यवंशीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये वैभव आणि वेगवान गोलंदाज हर्षित राणा यांच्यात काहीतरी संवाद होताना दिसतोय. दोघांच्या हावभावावरून त्यांच्यात खेळियाळीऐवजी काहीशी गरम चर्चा किंवा 'स्लेजिंग' सुरू असल्याचे स्पष्ट जाणवत आहे. हर्षितच्या गोलंदाजीवर वैभवने काही आक्रमक शॉट्स मारण्याचा प्रयत्न केला, ज्यामध्ये त्याने समोरच्या दिशेने मारलेला एक स्ट्रेट ड्राईव्ह अत्यंत प्रेक्षणीय होता.

### वैभवला संधी मिळण्याची शक्यता धूसर

१५ वर्षीय डावखुरा फलंदाज वैभव सूर्यवंशीने आयपीएल २०२६ मध्ये आपल्या स्फोटक फलंदाजीने ७७६ धावा कुटत 'ऑरेंज कॅप'वर नाव कोरले होते. याच विक्रमी कामगिरीमुळे त्याचे टीम इंडियाचे दरवाजे उघडले. तसेच, नुकत्याच श्रीलंकेत पार पडलेल्या 'अ' संघांच्या तिरंगी मालिकेच्या अंतिम सामन्यात त्याने डंबुला येथे श्रीलंका 'अ' विरुद्ध अवघ्या २९ चेंडूंत ९४ धावांची वादळी खेळी केली होती.

# मेस्सी-रोनाल्डोच्या स्पर्धेत एम्बाप्पेनं 'चान्स' मारला..!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**फ्रान्सचा स्टार खेळाडू किलियन एम्बाप्पेने फिफा वर्ल्डकप २०२६ मध्ये इतिहास पुन्हा बदलला. चित्याच्या वेगानं मैदानात धावणाऱ्या रियल माद्रिदकडून खेळणाऱ्या एम्बाप्पेने फ्रान्सला धमाकेदार विजय मिळवून दिला. राउंड ऑफ ३२ मध्ये फ्रान्सने स्विडनचा ३-० असा धुव्वा उडवला. यात एम्बाप्पेचा दोन धडाकेबाज गोलचा समावेश होता.**



एम्बाप्पेने ब्राझिलच्या रोनाल्डो नाझरिओ आणि लिओनिदास यांच्या नॉकआउटमधील प्रत्येकी ८ गोल्सचा विक्रम आज मागे टाकला.

लिओनेल मेस्सी हा फिफा वर्ल्डकप इतिहासात सर्वाधिक गोल करण्याऱ्यांच्या यादीत पहिल्या स्थानावर आहे. त्याने १९ गोल मारले आहेत. मात्र त्याने नॉकाऊटमध्ये फक्त ५ गोल मारले असून एम्बाप्पे हा या बाबतीत मेस्सीच्या खूप पुढे आहे. विशेष म्हणजे ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या नावावर फिफा नॉकाऊटमध्ये एकही गोल नाहीये.

सामन्याबद्दल बोलायचं झालं तर फ्रान्सच्या एम्बाप्पेने स्विडनच्या डिफेन्सचा धुव्वा उडवला. फ्रान्सच्या मायकले ओलिसे याने सामन्यात तीन गोलमध्ये असिस्ट करण्याची हॅट-ट्रिक साधली. त्यातील दोनवेळा एम्बाप्पेला बॉटम राईट कॉर्नर मिळाला. त्यानंतर त्याने आपला ट्रेडमार्क वेग आणि फिनिशिंगच्या जोरावर दोन गोल केले.

दरम्यान, सामना झाल्यावर फ्रान्सचे मॅनेजर दिदीअर यांनी सांगितलं की, 'सामन्यापूर्वी किलियन रेकॉर्ड्सकडे पाहत नाही. तो जागा शोधत असतो. मात्र त्याची जागतिक स्तरावर सातत्यानं कामगिरी करण्याची क्षमता त्याला एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवते.' एम्बाप्पेच्या या विक्रमी कामगिरीमुळे तो फिफा विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वात धोकादायक नॉकआऊट खेळाडूंमध्ये गणला जाऊ लागला आहे. अवघ्या कमी वयात त्याने केलेली ही कामगिरी भविष्यात आणखी अनेक विक्रम मोडण्याची क्षमता दाखवते. आगामी सामन्यांमध्येही त्याच्याकडून अशाच दमदार प्रदर्शनाची अपेक्षा फ्रान्सच्या चाहत्यांना आहे.

### नॉकआऊटचा बादशाह

या दोन गोलच्या जोरावरच एम्बाप्पेने जर्मनीचा स्टार माजी खेळाडू मिरोस्लाव्ह क्लोसे यांचा विक्रम देखील मागे टाकले. आता किलियन एम्बाप्पे हा फिफा वर्ल्डकपच्या इतिहासातील नॉकाऊट्समध्ये सर्वात जास्त गोल करणारा खेळाडू ठरला आहे. त्याच्या फिफा वर्ल्डकपमध्ये आतापर्यंत १८ गोल झाल्या आहेत. विशेष म्हणजे एम्बाप्पेची महानता ही त्याने नॉक आऊटमध्ये मारलेल्या १० गोलवरून दिसून येते. या बाबतीत रोनाल्डो आणि मेस्सी देखील आसपास नाहीत.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

epaper.mahaenews.com

ePaper

। गुरुवार ।
दि. 02 जून 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# ‘इंद्रायणी आमची नदीमाता’ : नदी सुधार प्रकल्पाचे स्वागत

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीने मंजुरी दिल्यानंतर नगरसेविका सारिका गायकवाड यांनी या निर्णयाचे स्वागत करत, येत्या ७ जुलैपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात यावे, अशी मागणी स्थायी समितीच्या सभेत केली.

यावेळी बोलताना सारिका गायकवाड म्हणाल्या की, “इंद्रायणी ही केवळ नदी नसून आमची नदीमाता आहे. देहू आणि आळंदी या जगप्रसिद्ध तीर्थक्षेत्रांमध्ये दरवर्षी लाखो वारकरी, भाविक आणि पर्यटक येत असतात. नदी सुधार प्रकल्पामुळे इंद्रायणीचे पाणी अधिक स्वच्छ होईल, नदीचे प्रदूषण कमी होईल आणि नदीकाठच्या नागरिकांना अधिक निरोगी व स्वच्छ वातावरण मिळण्यास मोठी मदत होईल. हा प्रकल्प पर्यावरण संवर्धनाबरोबरच धार्मिक, सामाजिक आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा आहे.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे लवकरात लवकर काम सुरू होणे आवश्यक असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ७ जुलैपूर्वी भूमिपूजन झाल्यास प्रकल्पाला गती मिळेल आणि नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण होतील.

यावेळी सारिका गायकवाड यांनी सांगितले की, इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प हा आमदार महेशदादा लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा करून प्रत्यक्षात आणलेला महत्त्वाकांक्षी उपक्रम असून, ही त्यांच्या विकासदृष्टीची स्वप्नपूर्ती आहे. या प्रकल्पासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांबद्दल आमदार महेशदादा लांडगे यांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले. स्थायी समितीच्या मंजुरीमुळे आता इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला असून, नदी संवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि भाविकांसाठी स्वच्छ व पवित्र नदी परिसर उभारण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

> “इंद्रायणी ही आमची श्रद्धास्थान असलेली नदीमाता आहे. देहू-आळंदीसारख्या पवित्र तीर्थक्षेत्रांमध्ये येणाऱ्या लाखो भाविकांना स्वच्छ, निर्मळ आणि प्रदूषणमुक्त इंद्रायणीचे दर्शन घडावे, ही प्रत्येकाची अपेक्षा आहे. इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला स्थायी समितीची मंजुरी मिळणे हा ऐतिहासिक निर्णय असून, नदीकाठच्या नागरिकांचे आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि भाविकांच्या सोयीसाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. हा प्रकल्प आदरणीय आमदार महेशदादा लांडगे यांच्या दूरदृष्टीचा आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा परिणाम आहे. आता या प्रकल्पाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ७ जुलैपूर्वी भूमिपूजन होऊन कामाला तातडीने सुरुवात व्हावी, हीच आमची अपेक्षा आहे.”
> **- सारिका गायकवाड, नगरसेविका, भाजपा.**






# महापालिका रखवालदारांच्या पदोन्नतीचा प्रश्न निकाली

## विधी समिती सभापती सुजाता निलेश बोराटे यांच्या संवेदनशील नेतृत्वाचा मोठा विजय

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विविध आस्थापनांमध्ये अहोरात्र प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या आणि मनपा मालमत्तेचे रक्षण करणाऱ्या शेकडो सुरक्षा रखवालदारांसाठी (सुरक्षा रक्षक) एक अत्यंत आनंदाची आणि ऐतिहासिक बातमी समोर आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला सुरक्षा रक्षकांच्या पदोन्नतीचा क्लिष्ट आणि रखडलेला प्रश्न महानगरपालिकेच्या विधी समितीच्या सभापती सुजाता निलेश बोराटे यांनी अत्यंत कणखर आणि संवेदनशील पाऊल उचलून यशस्वीपणे मार्गी लावला आहे.**




पात्र सुरक्षा रखवालदारांना आता अधिक आर्थिक लाभ आणि सन्मान मिळवून देण्यासाठी, त्यांना 'सुरक्षा सुपरवायझर' ऐवजी थेट 'सुरक्षा निरीक्षक' या उच्च पदावर पदोन्नती देण्याचा महत्त्वपूर्ण ठराव विधी समितीच्या बैठकीत एकमताने मंजूर करण्यात आला आहे. सभापती सुजाता बोराटे यांच्या या कामगारकेंद्री आणि धडाकेबाज निर्णयामुळे मनपाच्या सुरक्षा विभागात आनंदाचे वातावरण असून, कर्मचाऱ्यांनी त्यांच्या संवेदनशील नेतृत्वाचे मनापासून आभार मानले आहेत.

यापूर्वी महापालिकेत सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीची रचना अत्यंत क्लिष्ट आणि दीर्घकालीन होती. मूळ नियमांनुसार: १) पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या सुरक्षा रखवालदाराला सुरुवातीला 'सुरक्षा सुपरवायझर' या पदावर बढती दिली जात असे. २) त्यानंतर, तेथे काही वर्षे सेवा पूर्ण केल्यावर आणि पात्रता सिद्ध झाल्यावरच त्या सुपरवायझरला 'सुरक्षा निरीक्षक' या पदावर पदोन्नती मिळत होती. ३) या दुहेरी रचनेमुळे सुरक्षा रक्षकांना वाढीव वेतनश्रेणी मिळण्यास अनेक वर्षांचा विलंब होत होता आणि अनेक जण निवृत्त होईपर्यंत त्यांना हक्काचा फायदा मिळत नव्हता. या कर्मचाऱ्यांच्या व्यथा समजून घेत विधी समितीच्या अध्यक्षा सुजाता निलेश बोराटे यांनी या रचनेचा सखोल अभ्यास केला. त्यांनी थेट 'सुरक्षा सुपरवायझर' व 'सुरक्षा निरीक्षक' या दोन्ही पदांचे तांत्रिक समायोजन करून हे पद आता केवळ 'सुरक्षा निरीक्षक' असे एकच ठेवण्याचा महत्त्वपूर्ण तोडगा काढला. या नव्या रचनेमुळे आता पात्र ठरलेले सुरक्षा रक्षक थेट 'सुरक्षा निरीक्षक' बनू शकतील, ज्यामुळे त्यांना मोठा आर्थिक फायदा आणि प्रशासकीय अधिकार मिळतील.

> "महानगरपालिकेचा प्रत्येक सुरक्षा रखवालदार हा आपल्या शहराचे आणि पालिकेचे अहोरात्र रक्षण करणारा खरा रक्षक आहे. उन्हातान्हात, थंडी-पावसात स्वतःचा जीव धोक्यात घालून कर्तव्य बजावणाऱ्या या कष्टकऱ्यांच्या हक्काच्या पदोन्नतीचा विषय गेली अनेक वर्षे धूळ खात पडून होता, मी जेव्हा या पदाची धुरा हाती घेतली, तेव्हाच सुरक्षारक्षकांना न्याय मिळवून देण्याचा संकल्प केला होता. विधी समितीने आज केलेल्या या पदांच्या समायोजनाच्या ठरावामुळे आमच्या शेकडो बांधवांना थेट 'सुरक्षा निरीक्षक' बनण्याची आणि आर्थिक सुबत्ता मिळण्याची संधी मिळाली आहे. आगामी काळातही प्रत्येक घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहीन !"
>
> **- सुजाता निलेश बोराटे, सभापती, विधी समिती, पिं. चिं. मनपा.**

### होर्डिंग स्ट्रक्चरल ऑडिट व उत्पन्न वाढ

केवळ सुरक्षा रक्षक पदोन्नतीच नव्हे, तर शहराच्या सुरक्षिततेशी आणि मनपाच्या तिजोरीशी संबंधित अनेक महत्त्वाच्या विषयांवर सभापती सुजाता बोराटे यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. शहरात पावसाळ्यात होर्डिंग कोसळण्याच्या दुर्घटना टाळण्यासाठी सर्व अधिकृत आणि अनधिकृत होर्डिंग्जचे तात्काळ 'स्ट्रक्चरल ऑडिट' पूर्ण करून अधिकृत अहवाल सादर करण्याचे आदेश त्यांनी दिले. तसेच मनपा महसूल वाढ महापालिकेच्या मालकीच्या मोकळ्या जागा, आरक्षित भूखंड आणि व्यावसायिक मालमत्तांचा ताबा मिळवून मनपाच्या उत्पन्नात कशी वाढ करता येईल, याचे सूक्ष्म नियोजन त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेतून ५७ अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**महानगरपालिकेच्या विविध विभागांत प्रदीर्घ काळ प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि कर्तव्यभावनेने सेवा बजावत सेवानिवृत्त होत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महापालिकेच्या जडणघडणीत तसेच शहराच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे,त्यांच्या या उल्लेखनीय सेवाकार्याबद्दल महापालिकेच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात उपमहापौर शर्मिला बाबर यांनी त्यांचा सत्कार करत त्यांचेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.**




महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सन्मान समारंभात जून २०२६ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे ४२ तसेच स्वेच्छा सेवानिवृत्ती स्वीकारलेले १५ अशा एकूण ५७ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास कामगार कल्याण विभागाचे सहायक आयुक्त तानाजी नरळे,मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच कर्मचारी महासंघाचे उमेश बांदल,नंदकुमार इंदलकर,विविध विभागांतील कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

जून २०२६ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्यांमध्ये कार्यकारी अभियंता सुदर्शन वहीकर, उपअभियंता विद्युत श्यामसुंदर बनसोडे, प्रशासन अधिकारी जयवंत निरगुडे, असिस्टंट मेट्रन प्रतिभा नाईकरे, मुख्याध्यापक निर्मला खुडे, सायराबानू शिकलगार, सुनंदा कोंडे, विजया ढमाले, आशा निचळ, बाळुबाई माळी, स्नेहला मोरे, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) अनिल झोडे, शामसुंदर भंडारी, उपशिक्षक मीना पवार, रफियासुल्ताना सय्यद, अय्याज मोमीन, विजया भूतकर, संगीता पाटील, आरोग्य निरीक्षक राजेंद्र उजिनवाल, फिटर पद्माकर सावंत, वायरमन रोहिदास गोळे, वॉर्ड बॉय तानाजी दुदुस्कर, हनुमंत सोनवणे, रखवालदार दामू मुठे, हंबीर बवले, राजेंद्र पवार, शिपाई पंडीत साखरे, मजूर शंकर देवकर, बाळासाहेब कद्रू, सुरेश फुगे, सुनिल बहिरट, रामदास जाधव, रामअवध गोंड, शंकर नवरंग, रमाकांत सुर्वे, संजय असवलीकर, मधुकर सुतार, नाईक बाळा पवार, स्प्रे कुली पांडुरंग डामसे, सफाई कामगार संभाजी गोरखे, मृणालिनी रणपिसे तसेच गटरकुली मल्हारी अवतारे यांचा समावेश आहे.

### स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये सफाई कामगारांचा समावेश

तर स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये सफाई कामगार मंतोष जगताप, रविंद्र शिंदे, पारुवाई बचुटे, अलका खेंग्रे, मुनिता जाधव, लता कंडारा, लक्ष्मी घोडेस्वार, मुदलीयार मोतीराम,निशा नेटके,अनिता बनसोडे , सुनिता साळवे, स्प्रे कुली दत्तात्रय बालघरे, सफाई सेवक प्रभाकर वाघमारे आणि गटरकुली दाजी करवंदे,रमेश हेंद्रे यांचा समावेश आहे.

# आमदार महेश लांडगे यांचा सभागृहात औचित्याचा मुद्दा

## प्राधिकरण 'प्रॉपर्टी फ्री होल्ड' निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या (PCNDTA) गृहप्रकल्पांतील मालमत्ता तसेच निवासी भूखंड फ्री होल्ड करण्याच्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करून लाखो नागरिकांना कायमस्वरूपी मालकी हक्क द्यावा, अशी जोरदार मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महाराष्ट्र विधानसभेत औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली.**




आमदार लांडगे यांनी सभागृहात मांडलेल्या मुद्द्यात सांगितले की, तत्कालीन पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने विकसित केलेल्या गृहप्रकल्पांतील सदनिका, दुकाने, दालने, कार्यालयीन जागा तसेच निवासी भूखंड नागरिकांना ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्यावर वाटप करण्यात आले होते. त्यानंतर या मालमत्तांचे अधिकार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (PCMC) यांच्याकडे हस्तांतरित झाले. मात्र, राज्य शासनाने फ्री होल्डचा निर्णय घेतल्यानंतरही त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप झालेली नसल्याने नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे.

PMRDA हद्दीतील तब्बल ११ हजार २१३ सदनिका आणि ४९५ दुकाने, दालने व कार्यालयीन जागा फ्री होल्ड निर्णयाच्या अंमलबजावणीच्या प्रतीक्षेत आहेत. याशिवाय, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ताब्यात असलेले तत्कालीन PCNDTA चे ८ हजार ३७९ निवासी भूखंड अद्याप फ्री होल्ड धोरणाच्या कक्षेबाहेर आहेत. त्यामुळे सुमारे एक लाख मालमत्ता आणि पाच लाखांहून अधिक प्राधिकरणवासीयांचा हा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या प्रलंबित प्रश्नामुळे मालकी हक्काबाबत अनिश्चितता निर्माण झाली असून खरेदी-विक्री, बँक कर्ज, वारसा हस्तांतरण तसेच पुनर्विकासाच्या प्रक्रियेत नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

यावेळी आमदार लांडगे यांनी राज्य शासनाकडे चार महत्त्वाच्या मागण्या मांडल्या. PMRDA हद्दीतील गृहप्रकल्पांच्या फ्री होल्ड निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करावी, आवश्यक शासन आदेश, कार्यपद्धती (SOP), प्रीमियम निश्चिती आणि अर्ज प्रक्रिया त्वरित जाहीर करावी, तत्कालीन PCNDTA ने भाडेपट्ट्यावर वाटप केलेले व सध्या PCMC ताब्यात असलेले ८ हजार ३७९ निवासी भूखंड फ्री होल्ड करण्याचा प्रस्ताव येणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करावा आणि या दोन्ही निर्णयांमुळे लाखो नागरिकांना कायमस्वरूपी मालकी हक्कासह मालमत्तेशी संबंधित सर्व व्यवहार सुलभ करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली.

> प्राधिकरणातील लाखो नागरिकांना त्यांच्या स्वतःच्या घराचा आणि भूखंडाचा कायमस्वरूपी मालकी हक्क मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. फ्री होल्ड निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करून PMRDA हद्दीतील गृहप्रकल्प आणि तत्कालीन PCNDTA च्या निवासी भूखंडांना न्याय मिळवून देण्यासाठी मी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत आहे. येणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय मंजूर करून अंदाजे एक लाख मालमत्ता आणि पाच लाख प्राधिकरणवासीयांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नाला कायमस्वरूपी न्याय मिळवून देण्यासाठी माझा ठाम प्रयत्न राहील.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे कृषी दिन उत्साहात साजरा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे शिल्पकार स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे कृषी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये शेतीचे महत्त्व, शेतकऱ्यांचे राष्ट्रनिर्मितीतील योगदान आणि शाश्वत शेतीबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता.**




या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे सेवानिवृत्त कृषी अधिकारी श्री. परदेशी तसेच यशस्वी प्रगतशील शेतकरी श्री. सत्यवान बटवाल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक शेती, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, कृषी क्षेत्रातील नव्या संधी आणि शेतकऱ्यांच्या जीवनातील अनुभव याविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. शेती ही केवळ व्यवसाय नसून देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून प्रत्येक नागरिकाने अन्नदात्या शेतकऱ्यांविषयी आदर बाळगला पाहिजे, असा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमात शिक्षकांनी स्व. वसंतराव नाईक यांच्या कृषी क्षेत्रातील योगदानावर प्रकाश टाकला. त्यांच्या कार्यकाळात सुधारित बियाण्यांचा प्रसार, सिंचन सुविधांचा विस्तार, कृषी शिक्षणाला चालना, शेतकऱ्यांसाठी विविध कल्याणकारी योजना तसेच कापूस एकाधिकार खरेदी योजना यांसारख्या उपक्रमांमुळे महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राला नवी दिशा मिळाली. दुष्काळी भागांच्या विकासासाठी आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांनी केलेले कार्य विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी कृषीविषयक माहितीपर उपक्रम, घोषवाक्य सादरीकरण आणि चर्चासत्रात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

# पोलीस आयुक्तालयातील सात अधिकारी-अंमलदार सेवानिवृत्त

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील नियत वयोमानानुसार सात पोलीस अधिकारी व अंमलदार सेवानिवृत्त झाले. त्यांचा सत्कार व निरोप समारंभ मंगळवारी आयुक्तालयातील 'शिवनेरी हॉल' येथे पार पडला.

पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सहायक पोलीस आयुक्त सतीश नांदूरकर, दिक्षक साळुंके, पोलीस निरीक्षक शंकर डामसे, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक शांताराम उमे, रामदास नरवडे, सहायक पोलीस उपनिरीक्षक उन्मेश जोशी आणि पोलीस हवालदार राजू केदारी यांचा कुटुंबीयांसह सत्कार करण्यात आला.

त्यांना शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, सेवानिवृत्ती प्रमाणपत्र, ओळखपत्र, शुभेच्छापत्र, रोप व भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी पोलीस सहआयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, पोलीस उपआयुक्त गणेश इंगळे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी व कुटुंबीय उपस्थित होते.



# नागरी सुविधांमध्ये कोणतीही तडजोड नाही

## रखडलेल्या कामांवर तातडीची कारवाईचे निर्देश; नगरसेविका कविता भोंगाळे-पाटील

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**प्रभागातील नागरिकांना दर्जेदार, सुरक्षित आणि तत्पर नागरी सुविधा उपलब्ध करून देणे ही सर्वोच्च प्राथमिकता असून, विकासकामांमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई अथवा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा नगरसेविका कविता भोंगाळे-पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिला. प्रभागातील विविध नागरी समस्यांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत त्यांनी संबंधित विभागांना प्रलंबित कामे निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले.**




सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांच्या दालनात झालेल्या या बैठकीस 'इ' क्षेत्रीय कार्यालयाचे उपायुक्त वाघमोडे, तसेच स्थापत्य, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, विद्युत आणि इतर संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी नगरसेवक सागर गवळी आणि जालिंदर शिंदे यांनीही प्रभागातील विविध समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले.

बैठकीत दिघी रोडवरील रखडलेली विकासकामे, वारंवार तुंबणारी जलनिस्सारण व्यवस्था, स्टॉर्म वॉटर लाईनची अपुरी क्षमता, खराब झालेले रस्ते, पावसाचे पाणी साचणारे भाग, वीजपुरवठ्याशी संबंधित अडचणी तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणाऱ्या विविध मूलभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रत्येक कामाची सद्यस्थिती जाणून घेत संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रगतीचा अहवाल मागविण्यात आला.

नागरिकांच्या तक्रारींना सर्वोच्च प्राधान्य देत सर्व प्रलंबित कामे निश्चित वेळेत पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. विविध विभागांनी परस्पर समन्वय साधून विकासकामांना गती द्यावी, तसेच नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना राबविण्याचे निर्देशही बैठकीत देण्यात आले.

यावेळी कविता भोंगाळे-पाटील म्हणाल्या, "प्रभागातील प्रत्येक नागरिकाला दर्जेदार नागरी सुविधा मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. विकासकामांमध्ये कोणतीही दिरंगाई किंवा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही. प्रत्येक कामावर सातत्याने लक्ष ठेवून प्रशासनाशी समन्वय साधत नागरिकांचे प्रश्न वेळेत सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."

बैठकीत प्रभागातील सर्व विकासकामांचा सविस्तर आढावा घेऊन गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि वेळेत कामे पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित सर्व मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

> "प्रभागातील प्रत्येक नागरिकाला सुरक्षित, दर्जेदार आणि वेळेत नागरी सुविधा मिळणे ही आमची जबाबदारी आहे. कोणतेही विकासकाम रखडू देणार नाही किंवा गुणवत्तेशी तडजोड होऊ देणार नाही. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाशी सातत्याने समन्वय साधत नागरिकांच्या प्रत्येक समस्येचे वेळेत आणि कायमस्वरूपी निराकरण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."
>
> **- कविता भोंगाळे-पाटील, भाजपा, नगरसेविका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**



# माऊलींच्या पालखी सोहळ्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानसज्ज चांदीचा रथ

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी पालखी सोहळ्यासाठी यंदा परंपरा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम साधणारा चांदीचा रथ साकारण्यात आला आहे. हा रथ पालखी प्रस्थान सोहोळ्यात ८ जुलै रोजी दाखल होईल. पारंपरिक सौंदर्य अबाधित ठेवत रथाचे वजन कमी करण्याचे आव्हान पेलण्यात यश आल्यामुळे यंदाच्या पालखी सोहळ्यात बैलांना रथ ओढणे अधिक सुलभ होणार आहे.**



माऊलींच्या रथाची निर्मिती केआरए अर्थात कृष्णा राजाराम अष्टेकर ज्वेलर्स यांनी केली आहे. याविषयी माहिती देताना विपुल अष्टेकर म्हणाले की, रथ निर्मिती करताना त्याची मजबुती कायम राखत वजन शक्य तितके कमी करणे हे मोठे आव्हान होते. यासाठी केआरए ज्वेलर्सच्या कर्मचाऱ्यांनी अत्याधुनिक सिल्वर इलेक्ट्रोप्लेटिंग तंत्रज्ञानाचा वापर करत इपॉक्सी पॉलीस्टर रेझिन आणि कार्बन फायबर बेस यांच्या साहाय्याने रथाची निर्मिती केली. या तंत्रज्ञानामुळे रथाची मजबुती लोखंडाइतकी भक्कम असून त्याचे वजन ॲल्युमिनियमप्रमाणे हलके आहे. या नव्या रथाचे एकूण वजन सुमारे २.८ टन आहे.

रथाच्या निर्मितीत आळंदी देवस्थानातील शुभचिन्हांच्या हुबेहूब प्रतिकृती साकारण्यात आल्या असून रथाच्या अग्रभागी माऊलींच्या मूर्तीसह सूर्य, गरुड, हनुमान आणि जयविजय यांच्या प्रतिमा साकारण्यात आल्या आहेत. रथावरील आकर्षक आणि पारंपरिक नक्षीकाम ख्यातनाम शिल्पकार विवेक खटावकर यांनी केले आहे. त्यामुळे रथाला धार्मिक परंपरेशी सुसंगत आणि देखणे स्वरूप प्राप्त झाले आहे.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या आषाढी वारी पायी पालखी सोहळ्यासाठी रथाला बैलजोड सेवा देण्यावरून सुरू असलेला वाद सामोपचाराने संपुष्टात आला आहे. बैलजोड निवड समितीने अर्ज केलेल्या एकाच परिवारातील तिघांनाही पुणे, सातारा, सोलापूर या जिल्ह्यांसाठी सेवेची संधी देण्याचा निर्णय घेतल्याने वादावर पडदा पडला.पालखी सोहळ्यात पुणे जिल्ह्यासाठी हर्षवर्धन रानवडे, सातारा जिल्ह्यासाठी उमेश रानवडे आणि सोलापूर जिल्ह्यासाठी तुळशीराम रानवडे हे बैलजोड सेवा देणार आहेत. पालखी सोहळ्याची परंपरा आणि भाविकांच्या भावना लक्षात घेऊन समितीने तिन्ही अर्जदारांना सेवा विभागून दिली आहे.

### सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस

रथाजवळ होणाऱ्या भाविकांच्या गर्दीवर व रथाच्या सुरक्षेवर प्रभावीपणे लक्ष ठेवण्यासाठी रथावर १० सीसीटीव्ही कॅमेरे आणि जीपीएस तंत्रज्ञान बसविण्यात आले आहे. परंपरेचे जतन करत आधुनिक अभियांत्रिकीचा वापर करून साकारण्यात आलेला हा चांदीचा रथ यंदाच्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. आधुनिक सुरक्षा व्यवस्था आणि पारंपरिक वैभव यांचा सुंदर संगम साधणारा हा रथ भाविकांना अधिक सुरक्षित, सुव्यवस्थित आणि दिव्य अनुभव देणार आहे.